**ठळक बातम्या**

- राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचं मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत उद्घाटन
- X S I O इंडस्ट्री आणि राज्याचा उद्योग विभाग यांच्यात ५ हजार १२७ कोटी रुपयांचे करार
- नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी उद्या रविवारीही उमेदवारी अर्ज स्वीकारले जाणार
- गझलनवाझ भीमराव पांचाळे यांना विठ्ठल उमप फाऊंडेशनचा ‘मृदगंध जीवनगौरव पुरस्कार’ जाहीर

**आणि**

- पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताची पहिल्या डावात नाममात्र आघाडी तर दक्षिण आफ्रिकेचा दुसरा डावही गडगडला

**<><><><><>**

आदिवासी संस्कृती जपण्यासाठी सरकारनं अनेक योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली आहे आणि अनेक नव्या योजना आखल्या जात असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपुरात दिली. स्वातंत्र्यसेनानी बिरसा मुंडा यांच्या जयंतीचं औचित्य साधून आयोजित राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

**- - होल्ड मुख्यमंत्री - -**

महाराष्ट्रात एक कोटी २५ लाख आदिवासी असून १६ जिल्ह्यात त्यांच्या ४५ जमाती आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. आदिवासींना जल, जमीन आणि जंगलापासून न तोडता त्यांना संरक्षण देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं ते म्हणाले. आदिवासी नायकांना शोधून त्यांचा इतिहास जगासमोर आणण्यासाठीही सरकारनं प्रयत्न केल्याचं त्यांनी सांगितलं. केंद्रीय रस्ते, परिवहन आणि राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यावेळी

उपस्थित होते. त्यांनी सरकार आदिवासींच्या प्रगतीसाठी करत असलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'श्रीमती अनसूयाबाई काळे स्मृती सदना'चं आणि पूर्व विदर्भ महिला परिषदेच्या 'नोकरी करणाऱ्या महिला आणि मुलींच्या वसतीगृहा'चं उदघाटन केलं.

**<><><><><>**

आदिवासींची अस्मिता हजारो वर्षांच्या भारतीय जाणीवांचा अविभाज्य भाग आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. स्वातंत्र्यसैनिक आणि आदिवासी समुदायाचे नेते भगवान बिरसा मुंडा यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंतीनिमित्त गुजरातमधल्या नर्मदा जिल्ह्यातल्या देडियापाडा इथं एका कार्यक्रमात मोदी बोलत होते. यावेळी ९ हजार ७०० कोटी रुपयांहून जास्त खर्चाच्या विकास योजनांचं भूमिपूजन आणि उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं. या विकास योजनांच्या माध्यमातून या भागातल्या आदिवासी समाजाला शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा केल्या जाणार आहेत. स्वातंत्र्यांच्या लढाईतल्या आदिवासींच्या योगदानाविषयी मोदी म्हणाले…

**होल्ड… बाईट - नरेंद्र मोदी**

**<><><><><>**

X S I O इंडस्ट्री, ब्लॅकस्टोन आणि राज्याचा उद्योग विभाग यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज ५ हजार १२७ कोटी रुपयांच्या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. गुंतवणुकीची ही रक्कम ३ हजार कोटींनी वाढवून ८ हजार कोटी करण्यात येईल, अशी घोषणा X S I O आणि ब्लॅकस्टोन कंपनीच्या वतीनं करण्यात आली. ५ हजार कोटींच्या गुंतवणूकीमुळे राज्याच्या आर्थिक विकासात हे मोलाची भर पडणार आहे,

यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते X S I O इंडस्ट्रीयल एँड लॉजिस्टीक पार्कचं भूमीपूजन करण्यात आलं. समृद्धी महामार्गालगतच X S I O हा ७०० कोटी गुंतवणूकीचा जागतिक दर्जाचा पार्क उभारला आहे. तसंच १०५ एकरावरील दुसऱ्या टप्प्यातील ११०० कोटी गुंतवणूकीच्या उद्देशाने तयार करण्यात येणाऱ्या लॉजिस्टिक पार्कचं भूमिपूजन आज झालं. यामुळे जवळपास १० हजार रोजगार निर्माण होणार आहेत, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी उद्या, रविवारी देखील उमेदवारी अर्ज स्वीकारले जातील, असं निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. उमेदवारी अर्ज प्रत्यक्ष भरता येतील तसंच ऑनलाईनही दाखल करता येणार आहेत, असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. १७ नोव्हेंबरला उमेदवारी अर्ज दाखल करायची अंतिम मुदत आहे.

दरम्यान, रत्नागिरी नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी आज १७ जणांनी उमेदवारी अर्ज भरले. शिवसेनेकडून ९, भाजपा ५, प्रहार जनशक्ती पक्षाकडून एका आणि दोन अपक्ष उमेदवारांनी आज अर्ज सादर केले. रत्नागिरी नगरपरिषदेत महायुतीचा नगराध्यक्ष १२ ते १४ हजार मताधिक्याने निवडून येईल, असा विश्वास मंत्री उदय सामंत यांनी यावेळी व्यक्त केला.

**<><><><><>**

नगरपरिषद आणि नगर पंचायत निवडणुकीसाठी काँग्रेसने ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. यात रमेश चेन्निथला, हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार, खासदार शाहू छत्रपती, सतेज पाटील, बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, यशोमती ठाकूर आदी ज्येष्ठ नेत्यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

निवडणुकीत पराभव झाला म्हणून काँग्रेस संपेल ही टीका निरर्थक असून काँग्रेस पक्ष पुन्हा एकदा नव्या जोमानं आणि ताकदीनं उभा राहील असा विश्वास काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांनी व्यक्त केला. मुंबईत आज काँग्रेसचं एकदिवसीय शिबीर झालं त्यावेळी ते बोलत होते. काँग्रेस ही एक विचारधारा आहे, काँग्रेसवर लोकांचा विश्वास आहे, त्यामुळे काँग्रेस कधीच संपत नाही असं चेन्निथला म्हणाले. निवडणुकीत हार-जीत होतच असते, पण सत्ता नाही म्हणून थांबून चालणार नाही. नकारात्मकता सोडून लढाऊ बाणा अंगी बाळगा, असं आवाहन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

विठ्ठल उमप फाऊंडेशनचा ‘मृदगंध जीवनगौरव पुरस्कार’ गझलनवाझ भीमराव पांचाळे यांना जाहीर झाला आहे. हा पुरस्कार साहित्य, सामाजिक कार्य, लोककला, अभिनय आणि संगीत यांसारख्या विविध क्षेत्रांतील व्यक्तींना दिला जातो. शाहीर विठ्ठल उमप यांच्या १५व्या स्मृतीदिनानिमित्त १५वा लोकशाहीर विठ्ठल उमप स्मृती संगीत

समारंभ २६ नोव्हेंबरला मुंबईत होत आहे. त्यात पांचाळे यांना हा पुरस्कार दिला जाईल. शाहीर राजेंद्र राऊत, प्रदीप शिंदे, अभिनेते जयवंत वाडकर, परेश मोकाशी, मधुगंधा कुलकर्णी, अभिनेत्री रिंकू राजगुरू हेही यंदाच्या मृदगंध पुरस्काराचे मानकरी आहेत.

यापूर्वी विक्रम गोखले, पुरुषोत्तम बेर्डे, डॉ. अभय बंग, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले या मान्यवरांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

कोलकात्यात इडन गार्डन इथं सुरु असलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या दुसऱ्या दिवसाचा खेळ आज संपला तेव्हा दक्षिण आफ्रिकेनं दुसऱ्या डावात ७ बाद ९३ धावा केल्या होत्या. त्याआधी दक्षिण आफ्रिकेच्या १५९ धावांच्या प्रत्युत्तरादाखल भारतीय संघानंही पहिल्या डावात केवळ १८९ धावांपर्यंतच मजल मारल्यानं भारताला अवघ्या ३० धावांची आघाडी मिळाली. भारताचा कर्णधार शुभमन गिल दुखापतीमुळे ४ धावांवर माघारी परतला. त्यानंतर दुसऱ्या डावात फिरकीपटू रवींद्र जडेजानं २९ धावात ४ गडी बाद केल्यानं दक्षिण आफ्रिकेची दुसऱ्या डावातही ठराविक अंतरानं पडझड होत गेली. मात्र, कर्णधार टेम्बा बावुमाने एका बाजूने संयमी फलंदाजी करत नाबाद २९ धावा केल्यानं भारताला दक्षिण आफ्रिकेचा दुसरा डाव झटपट गुंडाळता आला नाही.

**<><><><><>**

दक्षिण मुंबईत भायखळा इथं आज दुपारी एका इमारतीचं बांधकाम सुरु असताना मातीचा ढिगारा कोसळून झालेल्या अपघातात बांधकामावरचे २ मजूर मृत्युमुखी पडले, तर ३ जण जखमी झाले. जखमींना नायर रुग्णालयात दाखल केलं असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याचं आमच्या वार्ताहरानं सांगितलं.

**<><><><><>**

राज्यात बहुतांश ठिकाणी गेले काही दिवस पहाटे आणि रात्रीच्या तापमानात घट दिसून येत आहे. मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी, तर विदर्भात बऱ्याच ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय घट झाली आहे. येत्या दोन दिवसांत संपूर्ण राज्यात हवामान कोरडं राहील असा अंदाज असून, या काळात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येईल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**